# उल्लेखनिय कामगिरीबाबत

## 1) रेपोस्टे गोंदिया अप.क 30/15 कलम 395,392,397,294,120(ब) भांदवी :-

दि. 30. 04. 20215 रोजी फिर्यादी नामे चंद्रभान विदुलम जेसुजा, वय 47, धंदा - व्यापार, रा. सिंधी कॉलनी गोंदिया तसेच इतर 3 सहप्रवाशी व्यापारी हे बल्लारशा गोंदिया पॅसेंजर ने गोंदिया पर्यंत प्रवास करीत असता रे.स्टे. सौंदड येथून ट्रेन सुमारे रात्री 19.35 वा सुटल्यानंतर दोन मिनीटांनी चालु गाडीत अज्ञात 4 इसमांनी तोंडाला गमछा बांधुन यातील फिर्यादी व सहप्रवासी यांना चाकुचा धाक दाखवुन, 2 प्रवाश्यांना डोक्यावर चाकु मारून जखमी केले व फिर्यादी तसेच इतर 2 सहप्रवाशी यांना अश्लील शिवीगाळ करुन त्यांचे जवळील एकुण 3 बॅग ज्यात एकुण 5,25,000/-रु तसेच एक ॲपल कंपनीचा मोबाईल कि 38,500/-रु असा एकुण 5,63,500/-रु चा मुद्देमाल जबरीने हीसकावून गाडीची चैन पुलींग करुन पळून गेले वरुन फिर्यादी व सहप्रवाशी यांचे जबाब वरुन रेपोस्टे गोंदिया येथे अप.क्र 30/15 कलम 392,397,34 भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासात रेपोस्टे गोंदिया यांनी स्था.गु.शा नागपूर यांचे सहकार्याने तपास सुरु केला गुप्तबातमीदार यांचे कडुन माहिती प्राप्त करुन सदर गुन्हयात शुभम परदेशी रा.गौशाला वार्ड गोंदिया हा सहभागी असल्याची माहिती मिळाली तसेच त्याचे मोबाईल कमांक प्राप्त केला घटनेचे रात्री त्यास घरी तपासले असता मिळुन आला नाही, त्याचे घटनेचे दिवशी व वेळी लोकेशन सायबर सेल लोहमार्ग नागपूर यांचे कडुन मिळविली असता रेस्टे सौदंड परीसरात असल्याची माहिती पुढे आल्याने व गोंदिया शहर येथील रेकॉर्ड वरील गुन्हेगार असल्याने नमुद गुन्हा त्याने केल्याची खात्री झाली परंतु तो घरी मिळुन न आल्याने त्याचे इतर मित्र साथीदारांचा शोध घेतला असता आरोपी नामे 1. परमानंद देवानंद नागभिरे वय 19, रा. गौतमनगर गोंदिया हा घरी मिळुन आल्याने त्यास विचारपूस केली असता त्याने नमुद गुन्हा इतर साथीदारांसह केल्याची माहीती दिली त्यास दि. 03.05.15 चे 18.20 वा स्था.गु.शा नागपूर व रेपोस्टे गोंदिया येथिल पथकाने त्यास अटक केली. तसेच त्याच्या माहितीचे आधारे आरोपी नामे 2. शुभम गोपाल चौव्हाण उर्फ परदेशी वय 21, रा.गौशाला वार्ड गोंदिया व 3. शाहरुख रज्जाक शेख वय 19, रा. गौतमनगर गोंदिया यांना दि. 04.05.15 चे 23.10 वा अटक करण्यात आली.

नमुद गुन्हयाचे तपासात आरोपी क्र 01 याचे कडुन 7000/- रु तसेच आरोपी क 02 व 03 यांचे कडुन 2,83,000/रु, असे एकुण 2,90,000/- रोख रक्कम व गुन्हयात वापरलेले हत्यार जप्त करण्यात आले. आरोपी क्र 2 याने गुन्हा करुण पळुन जाणे करीता वापरलेली मोटार सायकल जप्त करण्यात आली. तसेच आरोपी क 03 याने गुन्हा करुन पळुन जाणे करीता इतर इसमाची मोटर सायकल सांगितल्याने मोटर सायकल पुराव्याकामी जप्त करण्यात आली. तसेच आरोपी क 2 व 3 यांनी फिर्यादी व 2 सहफिर्यादीची 3 बॅग, हिशोब डाय-या व किरकोळ सामान हस्तगत केले.

तसेच यातील आरोपी क 04 हा फिर्यादीचा वाहन चालक असुन त्याने वरील आरोपी क 2 व 3 यांना यातील फिर्यादी हे दर गुरुवारी वडसा व इतर ठिकाणी जावुन व्यापाराचे पैसे वसुल करुन सांय. च्या ट्रेंन ने गोंदिया येत असल्याबाबत माहिती दिली व चेह-याची ओळख

सुध्दा करुन दिली आहे. यातील आरोपी क 4 याने फिर्यादीची माहिती पुर्वीच दिल्याने नमुद गुन्हा करण्यास सहाय्य केले त्यामुळे त्यास दि. 08.05.15 चे 23.10 वा अटक करण्यात आले.

सदर गुन्हयात अद्याप 2 आरोपी अटक करणे बाकी असुन नमुद गुन्हयात दोषारोपपत्र तयार करुन मा. कोर्टात सादर करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा तपास सपोनि संजय यु. सिंह करीत असुन त्यात सपोनि नितीनचंद्र राजकुमार सफो 487 तुलाराम बघेले, पोहवा 357 नितिने मेहर, पोहवा 863 चौधरी, पोहवा 1029 कटुके, पोना 330 चौबे, पोना 152 कोसरे, पोना 599 शैलेश उके, पोशि 1109 सेलोटे, पोशि 590 रोशन मोगरे यांनी गुन्हा उघडकीस आणण्यास योगदान दिले.

गोंदिया शहर ही व्यापाराची मोठी बाजारपेठ असुन त्यात सिंधी व मारवाडी वर्गाचा मोठा समावेश आहे. सदर गुन्हयात फियादी हा गोंदिया येथील व्यापारी असुन इतर 3 सहप्रवाशी सुध्दा गोंदिया येथील व्यापारी असल्याने व एकाच वेळी चारही गोंदिया येथील व्यापारी लोकांना धारदार शस्त्र दाखवुन व जखमी करुन दरोडा टाकल्याने व्यापारी वर्गात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते व रेल्वे पोलीसांवर असंतोष व्यक्त करीत होते, त्यामुळे नमुद गुन्हा उघडकीस आणण्यास दडपण निर्माण झाले होते. परंतु नमुद गुन्हा झाले नतर 4 दिवसांचे आत वरील आरोपतांना अटक करुण गुन्हा उघडकीस आणला त्यामुळे गोंदिया येथील व्यापारी वर्गाने रेल्वे पोलीसांचे कौतुक केले आहे.

## 2) रेपोस्टे मनमाड अप.क 63/15 कलम 302,394,397,504,34 भांदवी :-

सदर गुन्हयातील फिर्यादी नामे श्री.महेशकुमार पुनाई साफी, वय 19 वर्ष, ग्राम मडार, पोस्ट - जितवापूर, पंचायत - जगतपूर थाना - रहीका, जि - मधुबनी, बिहार. मो.नं. 7507911306, 8600529897 व यातील मयत नामे सुनिलकुमार कारी साफी, वय 20 वर्ष, ग्राम मडार, पोस्ट - जितवापूर, पंचायत - जगतपूर थाना - रहीका जि - मधुबनी, बिहार. हे दि.29.04.2015 रोजी ट्रेन नं. 11061 डाउन पवन एक्सप्रेसचे मागील जनरल कोच क्र. CR-13450 मध्ये नाशिकरोड रेल्वे स्टेशन ते दरभंगा रेल्वे स्टेशन असा प्रवास करित असतांना रेल्वे स्टेशन मनमाड येथुन गाडी सुटलेनंतर 05 ते 10 मिनिटांनी रेल्वे स्टेशन पानेवाडीनंतर धावत्या गाडीत मयत नामे सुनिल यास वरिल वर्णनाचे दोन इसमांनी शिवीगाळ केली व त्यापैकी एका इसमांनी जबरीने पैसे काढणेकरिता चाकुने भोसकावुन जीवे मारले व सदर गाडी रेल्वे स्टेशन नांदगाव येथे हळु झाली असता तेथे उतरुन पळुन गेले बाबत फिर्याद रेल्वे पोलीस ठाणे, चाळीसगांव येथे दिली त्यावरुन शुन्य कमाकाने गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचे मुळ कागदपत्र रे.पो.स्टे मनमाड येथे वर्ग करुन गुन्हा दाखल करण्यात आला.

दि.02.05.2015 रोजी सदर गुन्हयाचे तपासात मा.पोलीस अधिक्षक सो, लोहमार्ग नागपूर यांनी गुन्हयाचे तपासकामी पो.स्टेला भेट देवुन सदर गुन्हयाचे तपासात तोंडी सुचना दिल्याप्रमाणे तपास सुरु केला तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग मनमाड यांनी सदर गुन्हयाचे तपासात वेळोवेळी मदत केली तसेच मार्गदर्शक सुचना दिल्या.

सदर गुन्हयाचे तपासात नांदगाव, चाळीसगाव, मनमाड परिसरातील गुप्तबातमीदार यांचेकडुन दि. 03.04.2015 रोजी मिळालेल्या माहितीवरुन के एस जांभळे, पो.नि, (तपासी अधिकारी), सपोनि सुरसे, श्री.देसले, स्था.गु.शा लोहमार्ग मनमाड असे सदर गुन्हयाचे तपासात आरोपीतांचे शोधत असतांना आरोपी नामे संजय पवार यास पोलीस ठाणे, रा.चाळीसगांव यास स्थानिक पोलीसाचे मदतीने ताब्यात घेवुन मनमाड पो.स्टेला आणले नंतर चौकशीअंती संजय पवार याने दिलेल्या जबाबावरुन सदर गुन्हा हा त्याचे साथीदार नामे सचिन पाटील व कृष्णा गोस्वावी यांचेसह केला असल्याची कबुली दिली असुन सदर गुन्हा त्याने केला असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात आरोपी नामे संजय पवार यास दि.04.05.2015 रोजीचे 15.25 वा दोन पंचासमक्ष अटक केली असता सदर गुन्हयातील गेला मालापैकी 600/-रु रोख मिळुन आल्याने जप्त करण्यात आले.

सदर गुन्हयातील आरोपी नामे सचिन पाटील व कृष्णा गोस्वावी यांचे शोधात पोलीस अधिकारी व कर्मचारी असतांना आरोपी नामे सचिन पाटील हा रेल्वे स्टेशन मनमाड हद्दीत मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन पो.स्टेला आणुन कसुन चौकशी केली असता त्याने दिलेल्या जबाबानुसार सदर गुन्हा हा त्याने केला असल्याचे निष्पन्न झाल्याने, सदर गुन्हयात त्यास दि.04.05.2015 रोजीचे 15.25 वा दोन पंचासमक्ष अटक केली असता त्याचे जवळुन सदर गुन्हयातील गेले मालापैकी 400/-रु रोख मिळुन आल्याने जप्त करण्यात आले आहे. सदर गुन्हयातील फिर्यादी यांचे कडुन यातील अटक आरोपीतांची ओळखपरेड घेणे आवश्यक असल्याने त्या अनुषंगाने त्यांचा चेहरा कोणास दिसणार नाही याकरिता मा.कोर्टात हजर करतेवेळी सर्व काळजी घेवुन आरोपीस काळे बुरखे घालण्यात आले. तसेच सदर गुन्हयात कलम 392 भा.दं.वि ऐवजी कलम 394,397 भा.दं.वि समाविष्ट करण्यात आले आहे.

सदर गुन्हयाचे तपासात मिळालेल्या गोपनीय माहितीवरून आरोपी क्र.01 यास ताब्यात घेण्यात आले तसेच आरोपी नामे सचिन हा संशयीतरित्या मिळुन आल्याने ताब्यात घेवुन त्यांचेकडे केलेल्या सखोल चौकशीत सदर गुन्हा हा कृष्णा याचेसह केल्याचे निष्पन्न झाल्याने दि.04.05.2015 रोजी अटक करण्यात आली होती. आरोपी क्र.01 व 02 यांना दि.05.05.2015 रोजी मा.कोर्टा समक्ष अटक आरोपीतांना हजर करून दि.11.05.2015 पावेतो पोलीस कस्टडी रिमांड प्राप्त केला तसेच पाहिजे असलेला आरोपी कृष्णा गोसावी याचे शोधत श्री.देसले, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा लोहमार्ग नागपूर , श्री.सुरसे, स.पो.नि, व स्टॉफ यांनी कृष्णा यास पुणे येथुन ताब्यात घेतले तेव्हा कृष्णा याने दिलेल्या जबाबानुसार सदर गुहयात हरिष जगताप हा सहभागी असल्याचे निष्पन्न झाल्याने हरिष यास नाशिक येथुन ताब्यात घेवुन पो.स्टेला आणले. तेव्हा सदर गुन्हयातील चारही आरोपी यांनी एकमेंकाना ओळखले व सदर गुन्हा केल्याची कबुली दिल्याने सदर गुन्हा हा त्यांनी केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी कं.03 व 04 यांना दि.05.05.2015 रोजीचे 23.40वा दोन पंचासमक्ष अटक करण्यात आली असुन त्याचे अंगझडतीत आरोपी नामे कृष्णा गोसावी यांचे अंगझडतीत 100 रू दराची 03 नोटा असे 300/-रू व आरोपी कं.04 हरिश गोसावी यांचे अंगझडतीत 100 रू दराची 02 नोटा असे 200/-रू असे गुन्हयातील पैसे मिळुन आल्याने गुन्हयात जप्त करण्यात आले.

सदर गुन्हयातील अटक आरोपी याचेकडुन गुन्हयात वापरण्यात आलेला चाकु व उर्वरित रोख रूपये 3000/- रूपये गुन्हा करतेवेळी वापरलेले कपडे जप्त करणे आवश्यक असल्याने मा.कोर्टाकडुन चारही आरोपीतांचा दि.11.05.2015 पावेतो पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आला. सदर कालावधी आरोपीतांना आम्ही व पो.स्टे अधिकारी यांचे मदतीने अटक चारही आरोपी यांना वेळोवेळी विश्वासात घेवुन युक्ती प्रयुक्तीने विचारपुस केली असता यातील अटक आरोपी नामे कृष्णा गोसावी याने दि.09.05.2015 रोजी पंचासमक्ष भा.पु.का कलम 27 प्रमाणे दिलेल्या निवेदनानुसार गुन्हयात वापरलेला चाकु हस्तगत करण्यात आला. तसेच दि.09.05.2015 रोजी आरोपी नामे कृष्णा गोसावी याचें राहते घराची घरझडती घेतली असता त्याने गुन्हा करतेवेळी वापरलेला एक जिन्स पॅन्ट जप्त करण्यात आली आहे. तसेच दि.09.05.2015 रोजी आरोपी नामे सचिन पाटील याचे राहते घराची घरझडती घेतली असता त्याने गुन्हा करतेवेळी वापरलेले एक पिवळया रंगाचे शर्ट व एक जिन्स पॅन्ट जप्त करण्यात आला. सदर आरोपीतांची दि.13.05.2015 रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर करण्यात आला होता त्यानंतर त्यांची मा.कोर्टाने न्यायालयीन कोठडी मंजुर केली असुन सध्या ते मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे आहे.

सदर गुन्हयाचे तपासाअंती गुन्हयात दोषारोप पत्र क्र. 33/205 दिनांक 04/08/2015 अन्वये रवाना करण्यात आले आहे.

सदर गुन्हयाच्या तपासात पोलीस अधिकारी सी.डी.भाबल,पो.नि, रे.पो.स्टे नाशिक रोड,अतिरिक्त कार्यभार - उपविभागीय पोलीस अधिकारी लोहमार्ग मनमाड, के एस जांभळे, पो.नि (तपासी अधिकारी), वासुदेव देसले, पो.नि, स्थागुशा लोहमार्ग भुसावळ, श्री कोल्हे सहायक पोलीस निरीक्षक, सायबर सेल लोहमार्ग नागपुर, सहायक पोलीस निरीक्षक किरण वि सुरसे, नरहरी बडवर पोलीस उपनिरीक्षक, शरद सोनवणे पोलीस उपनिरीक्षक, स.पो.उ.नि/498 रॉय, पो.हवा./411 अहिरे, पोहवा/448 बच्छाव, पोना/267 कुरेशी, पोशि/443 संतोश निंभोरकर, पो.शि./199 गवई, पोशि 1129 रामटेके, पो.शि/589 घोंगडी, पोशि 1099 इंगोले नेम. सायबर सेल लोहमार्ग नागपुर यांनी कामगिरी बजावली.

**3) गुन्हा रजि.नं. अ. 140/2015 कलम 395 भा.दं.वि**

सदर गुन्हयातील फिर्यादी नामे रत्नाकर गंगाधर थोटे, वय 22 वर्षे, धंदा-मजुरी सिन्नर एम.आय.डी.सी. मधील ओके फन्ट येथे ठेकेदार शरद दराडे यांचे कडे, शिक्षण- एस.वाय.बी.ए. राहणार- वॉर्ड नं. 03 , खुर्शीपार, पोस्ट गुंथारा, तालुका जिल्हा भंडारा, 9850318765 व 12 सहप्रवाशी असे दि. 31/07/2015 रोजीचे 00.30 ते 01.20 वा. दरम्यान ट्रेन 12810 अप हावडा मुंबई मेलचे पाठीमागील तीस-या जनरल बोगीत प्रवासात असतांना रेल्वे स्टेशन मनमाड ते रेल्वे स्टेशन ओढा दरम्यान अनोळखी 10 ते 12 ईसमांनी संगनमतानी लाथाबुक्यांनी मारहाण करून त्यांचेकडील रोख रक्कम व मोबाईल असा एकूण 38432/-रु. चा माल जबरीने हिसकावून नमूद ट्रेनची चैन पुलींग करून उतरून पळून गेलेबाबत फिर्यादी यांनी रेपोस्टे. नाशिक रोड येथे तक्रार दिलेवरून शुन्य कमांकाने गुन्हा दाखल करून गुन्हयाचे कागदपत्र लोहमार्ग पोलीस ठाणे मनमाड येथे वर्ग करुन गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासात दि. 31/07/2015 रोजी के.एस.जांभळे, पोलीस निरीक्षक, लोहमार्ग पोलीस ठाणे मनमाड व अधिकारी/कर्मचारी तसेच मा.उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग मनमाड यांनी आरोपी जेथे उतरले तेथे भेट दिली. तसेच सदर गुन्हयाचे तपासकामी वेगवेगळे तपास पथक तयार करून आरोपीचा शोध घेणेकामी योग्य त्या सुचना देवुन रवाना करण्यात आले.

सदर गुन्हयाचे तपासकामी दि.01/08/2015 रोजी मा.पोलीस अधिक्षक सो, लोहमार्ग नागपूर व मा.उपविभागीय पोलीस अधिकारी सो, लोहमार्ग मनमाड यांनी लोहमार्ग पोलीस ठाणे, मनमाड येथे सदर गुन्हयाचे सदंर्भात भेट देवुन सदर गुन्हयाचे तपासकामी मार्गदर्शक सुचना दिल्या त्या समजावुन घेवुन त्या अनुषंगाने तपास केला.

सदर गुन्हयाचे तपासात स्था.गु.शा लोहमार्ग भुसावळ येथील अधिकारी यांनी सायबर सेल लोहमार्ग नागपुर च्या मदतीने तपास सुरु केला, सायबर सेल लोहमार्ग नागपुर येथील अधिकारी व कर्मचा-यांनी अहोरात्र प्रयत्न करुन मोबाईलच्या सहाय्याने आरोपीतांचे लोकेशन अल्पावधीत प्राप्त करुन सदर माहीती स्था.गु.शा लोहमार्ग भुसावळ यानां पुरवून आरोपीतांचा शोध घेण्यात आला व त्यातील एक आरोपीत जेल रोड नाशिक येथे असल्याची माहीती सायबर सेल लोहमार्ग नागपुर कडुन कळल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले.

सदर गुन्हयाचे तपासात असतांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून के.एस.जांभळे, पोलीस निरीक्षक, लोहमार्ग पोलीस ठाणे मनमाड व श्री.देसले उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग मनमाड, स्टॉफ असे नाशिक, शिर्डी येथे रवाना होवुन. शिर्डी येथुन नमुद गुन्हयातील 07 आरोपी यांना ताब्यात घेवुन पो.स्टेला आणले. त्याचेकडे कसुन चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा हा त्यांनी संगनमताने केले असल्याबाबत कबुली दिली तसेच त्यांचेकडे गुन्हयातील गेलेले मोबाईल मिळुन आल्याने सदर गुन्हा त्यांनी केला असल्याचे निष्पन्न झाल्याने व नमूद गुन्हयातील उर्वरित गेला माल हस्तगत करणे

असल्याने त्यांची मा. वैद्यकीय अधिकारी सो. उपजिल्हा रुग्णालय मनमाड ता. नांदगांव जि. नाशिक यांचेकडे अटकपुर्व वैद्यकीय तपासणी करुन दि. 02/08/2015 रोजीचे 02.30 अटक करण्यात आली. त्यांचे अटकेची माहीती त्यांचा मित्र नामे प्रविण प्रदिप पवार यास समक्ष देण्यात आलेली आहे. तसेच सि.आर.पी.सी. 50 प्रमाणे आरोपीतांना त्यांचे अटकेची माहीती व जामिनाचा हक्क समजावून सांगुन नमुद गुन्हयातील अटक 10 आरोपी यांना मा.रेल्वे कोर्ट मनमाड यांचे समक्ष दि.02/08/2015 रोजी हजर केले असता मा.कोर्टाने नमुद आरोपीताची दि.09/08/2015 पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली.

दि.03/08/2015 रोजी सदर गुन्हयातील अटक आरोपी यांची सखोल चौकशी केली असता यातील अटक आरोपी नामे मतेश जेडगुले याने त्याचे राहते घरातुन सदर गुन्हयातील गेलेला एक कार्बन कं. चा मोबाईल जप्त करण्यात आला.

सदर गुन्हयातील अटक आरोपी उमेश कैलास सातदिवे वय 19 वर्षे रा. गोरेवाडी, सदन चाळ, नाशिक रोड जि. नाशिक याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने पंचासमक्ष दि.02/08/2015 रोजीचे 02.30वा सदर गुन्हयात अटक करण्यात आली होती परंतु अटक आरोपी यांनी अटक करते वेळी त्यांचे वय 19 वर्षे सांगितले होते त्याचे जन्माबाबत कोणताही पुरावा त्याचेकडुन अथवा त्याचे नातेवाईकाकडुन प्राप्त झाला नव्हता. सदर आरोपीतास मा.कोर्टासमक्ष दि.02/08/2015 रोजी हजर केले असता मा. कोर्टाने सदर अटक आरोपी व त्याचे इतर 09 साथीदार यांचा दि.09/08/2015 पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला व दि.05/08/2015 रोजीचे नमुद विधीसंघर्षित बालकाचे वयाबाबत मा.रेल्वे कोर्ट येथे पुराव्यानिशी वकिलामार्फतीने अर्ज केला असुन त्यावर मा. कोर्टाने सदर विधीसंघर्षित बालक नामे उमेश कैलास सातदिवे वय 17 वर्षे 02 महिने यास तात्काळ मा.बाल न्यायालय , नाशिक येथे हजर करावे असे आदेशित केल्याने त्यास मा. बाल न्यायालय, नाशिक येथे 14 दिवस एम.सी.आर मिळणेकामी हजर केले असता दि. 19/08/2015 पावेतो न्यायालयीन कोठडी दिली असुन त्याची रवानगी बाल रिमांड होम, नाशिक येथे करण्यात आली असुन तेथे जमा करण्यात आले आहे.

सदर गुन्हयाच्या तपासात पोलीस अधिकारी के एस जांभळे, पो.नि वासुदेव देसले, पो.नि, स्थागुशा लोहमार्ग भुसावळ, श्री नितीनचंद्र राजकुमार, सहायक पोलीस निरीक्षक, स्थागुशा लोहमार्ग नागपुर, सहायक पोलीस निरीक्षक परदेशी, सहायक पोलीस निरीक्षक डोंगरे, व इतर अधिकारी कर्मचारी तसेच पोशि 1072/करमरकर, पोशि 1111/खवसे नेम. सायबर सेल लोहमार्ग नागपुर यांनी मोलाची कामगिरी बजावली.